
9 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कार्यमग्न कुलगुरू

**शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू, प्रा. द. ना. धनागरे यांचा नुकताच पहिला स्मृतिदिन झाला. त्यानिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा...**



स्मरण

राम देशपांडे

महालक्ष्मी बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त प्रा. राम शेवाळकर यांची तीन व्याख्याने आयोजित केली होती. त्यासाठी शेवाळकर सर कोल्हापुरात मुक्कामासाठी होते. मुक्काम एक दिवसाचा असो वा चार दिवसांचा, तो गाठीभेटींनी भरगच्च असायचा. यावेळी त्यांचा मुक्काम हॉटेल ओपलवर होता. सकाळी माझी व सरांची भेट झाली. त्या भेटीत त्यांनी आपल्याला नव्या कुलगुरूंना, डॉ. द. ना. धनागरे यांना भेटायला जायचंय, त्यांना शुभेच्छा देऊ या,' असे सांगितले. कुलगुरुंच्या बंगल्याची रंगरंगोटी सुरू असल्यामुळे त्यांचे वास्तव्य विद्यापीठाच्या नव्या अतिथीगृहात होते. त्यांना फोन केला. शेवाळकर सर बोलले. त्यांनी आपणहून मीच तुम्हाला हॉटेलवर येतो म्हणून सांगितले. त्यावर शेवाळकर सर खास शैलीत धनागरे सरांना म्हणाले, 'तुम्ही आता नुसते धनागरे सर नाही तर विद्यापीठाचे कुलगुरू आहात. वाशीमला शिक्षक होतो त्यावेळी तुमच्याच घरी काही काळ राहिलो होतो. नारायणराव धनागरे यांच्याशी त्यावेळी जुळलेला स्नेह अखेरपर्यंत कायम होता. हे सारं खरं असलं तरी तुम्ही आता या पीठाचे शंकराचार्य आहात. म्हणून आम्हीच तुम्हाला भेटायला यायचं. आम्ही येतो भेटायला.'

आम्ही ठरल्यावेळी अतिथीगृहात पोचलो. शेवाळकर सरांना पाहताच ते आणि निशावहिनी पुढे आले. वाकून नमस्कार करणार एवढ्यात शेवाळकर सर म्हणाले, 'अहं, आता तुम्ही वाकायचं नाही. ते काम आमचं आहे आणि ते आम्हाला करु द्या. सरांनी नव्या कारकिर्दीला शुभेच्छा दिल्या. वाशिमच्या आठवणींना उजाळा मिळाला. आपल्या स्नेह्यांचा मुलगा कुलगुरु झाला याचा आनंद शेवाळकर सरांच्या चेहऱ्यावर दिसत होता. शुभेच्छा दिल्या आणि जायला निघणार एवढ्यात धनागरे सर शेवाळकर सरांना म्हणाले, 'बऱ्याच दिवसांनी भेटलो. कितीतरी वर्षात तुमची व्याख्याने ऐकायला मिळाली नाहीत. आज पाहतो कसं काय जमतं ते!' सरांनी एवढंच धनागरे सरांचं बोलणं लक्षात ठेवलं आणि निरोप घेऊन आल्यावर बँकेचे तत्कालीन अध्यक्ष अष्टेकर यांना फोन केला आणि सांगितलं, 'विद्यापीठाच्या नव्या कुलगुरूंना आत्ताच भेटून आलो. तुम्ही एक काम करा. तुम्ही स्वतः विद्यापीठात जाऊन त्यांना बँकेतल्या व्याख्यानाला सपत्नीक यायचे आमंत्रण द्या. आता ते कुलगुरू आहेत. या पदाचा मान राखायला हवा,' वेळेच्या आधी पाच मिनिटे धनागरे सर बँकेत आले. व्यासपीठासमोर बसून शेवाळकर सरांचे व्याख्यान ऐकले. दुसऱ्या दिवशीही येण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे ते आले. तिन्ही व्याख्याने त्यांनी ऐकली. यामुळे त्यांचा परिचय झाला. कुलगुरूपदाची जबाबदारी ते समर्थपणे पार पाडत होते. व्यापही खूप मोठा होता. त्यांचा कामाचा उरक वाखाणण्यासारखा होता. मध्येच एखादी मिटिंग असायची. ती झाली की परत काम सुरु. कधी कधी काम संपवून बंगल्यावर चालले तरी बऱ्याच फाइल्स ते घरी न्यायचे आणि रात्री रात्री जागून निर्णय घेत.

अधूनमधून माझी त्यांची भेट व्हायची. पण ती ऑफिसवेळेत फार कमी. काही समारंभाच्या निमित्ताने गाठभेट व्हायची. तर कधी त्यांच्या बंगल्यावर. मात्र आधी फोन केल्याशिवाय भेटायचे नाही, ठरलेली वेळ पाळायची ही शिस्त मात्र माझी मीच स्वतःला लावून घेतली होती. सर आता रुळले होते. विद्यार्थी त्यांचे प्रश्न, त्यांच्या अडीअडचणी, प्राध्यापकांचे प्रश्न या विषयात त्यांना विशेष रस वाटायचा. शैक्षणिक उपक्रमात ते वेळात वेळ काढून भाग घ्यायचे. मात्र हे करत असताना ते सवंग लोकप्रियतेच्या मागे कधी लागले नाहीत. कुलगुरूपदाची शान अखेरपर्यंत कायम ठेवली. व्यवस्थितपणा, नीटनेटकेपणा, स्वच्छ-स्पष्ट शब्दांत निर्णय घेण्याची त्यांची क्षमता पाहण्याजोगी होती. इंग्रजी, मराठी, हिंदी भाषेवर प्रभुत्व होते. एखादा विषय समजून घ्यायचा असेल तर ते मुद्दाम त्या, संबंधित व्यक्तीला बोलावून घ्यायचे. विषय समजून घ्यायचे, चर्चा करायचे, त्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणाने ऐकून घ्यायचे आणि मग निर्णय घ्यायचे. मात्र ते निर्णय कधी रेंगाळलेले मी पाहिले नाहीत. अर्थात एक-दोन अशा कामातच मी हा त्यांच्या कार्यपद्धतीचा अनुभव घेतला. पण नियोजनबद्ध काम करण्याची पद्धत खूप काही सांगून गेली. अशाच काही घटनांचे साक्षीदार होण्याचे भाग्य मिळाले. अशा या छोट्या-मोठ्या घटनांमधूनच त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंवर प्रकाश पडला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

9 MAR 2018
सकाळ

# विरोधाभासाची दरी कमी करण्यासाठी प्रयत्न हवेत

## डॉ. वैशाली पाटील : विद्यापीठात 'बेटी बचाव' अभियानांतर्गत कार्यक्रम

कोल्हापूर, ता. ८ : समाजामधील आर्थिक उन्नतीच्या विरोधाभासाची दरी कमी करण्यासाठी प्रयत्नपूर्वक कार्य केले पाहिजे, असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'बेटी बचाव' अभियानांतर्गत जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. श्रीमंत युवराज्ञी संयोगिताराजे छत्रपती प्रमुख पाहुण्या होत्या. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. पाटील म्हणाल्या, "देशाची प्रगती साध्य करण्यासाठी महिलांच्या सबलीकरणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जीवनातील प्रतिकूल परिस्थितीमध्ये संयम



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'बेटी बचाव' अभियानांतर्गत कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील. शेजारी श्रीमंत युवराज्ञी संयोगिताराजे छत्रपती, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. भारती पाटील.

वाळगण्याचे बाळकडूच महिलांना मिळालेले असते. स्वातंत्र्याच्या चळवळीत जितक्या शेतकऱ्यांनी जीवदान दिले. त्याहीपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी मागील दहा वर्षांमध्ये आत्महत्या केलेल्या आहेत. काबाड कष्ट करून मुलांच्या शिक्षणाचा आणि संसाराचा गाडा समर्थपणे हाकण्यासाठी शेतकरी महिलांची जिद्दीने धडपड आहे."

संयोगिताराजे छत्रपती म्हणाल्या, "सशक्त समाज घडविण्यामध्ये महिलांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे स्त्रीयांनी स्वत:ला अबला समजू नये. समाज बळकट करण्यासाठी विचारांची वाईट प्रवृती नष्ट केली पाहिजे. त्याची सुरवात घरापासूनच झाली पाहिजे." डॉ. शिर्के म्हणाले, "प्रत्येक दिवस हा महिला सन्मान दिवस असतो. विद्यापीठामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलींना प्राधान्याने वसतिगृह उपलब्ध करुन दिले जाते. त्यामुळे मुलींची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ होत आहे." शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील उपस्थित होते. डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मीना पोतदार यांनी सूत्रसंचालन केले.

9 MAR 2018 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्य विकासातून महिलांनी प्रगती साधावी

## डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठात पवार अध्यासन, 'माविम'तर्फे महिला मेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कौशल्य विकासातून महिलांनी प्रगती साधावी. बचतगटांच्या माध्यमातून त्यांनी कार्यरत राहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे (माविम) आयोजित महिला सशक्तीकरण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या लोककला केंद्रातील या कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मानव विज्ञान अधिशाखेच्या अधिष्ठाता प्रा. भारती पाटील, महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त मंगेश शिंदे प्रमुख उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, महिलांना कौशल्य विकासासाठी आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाद्वारे मदत केली जाईल. समाजातील अन्य महिलांनाही बचतगटाबाबत माहिती देऊन बचतगटाच्या या चळवळीमध्ये त्यांना सामील करून घ्यावे. सहाय्यक आयुक्त शिंदे म्हणाले, बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत.

या मेळाव्यास नाबार्ड जिल्हा विकास अधिकारी नंदू नाईक, जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे, आयडीबीआय बँकेचे विजय फडके, सुनील सावंत, आयडीबीआय बँकेचे विभागीय व्यवस्थापक वेणू गोपाल, आदींसह सुमारे १६०० महिला, युवती उपस्थित होत्या. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या प्रकल्प संचालक डॉ. सुमन बुवा यांनी प्रास्ताविक केले. विनायक कुलकर्णी यांनी आभार मानले.

### २१०० बचत गट ऑनलाईन

- महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी बाळासाहेब झिंजाडे यांनी सांगितले, महामंडळाच्या माध्यमातून जिल्ह्यात अडीच हजार बचत गटांच्या माध्यमातून ३९ हजार महिलांचे संघटन केले आहे.
- 'तेजस्विनी' कार्यक्रमात कोल्हापूर जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे. 'ई शक्ती' या 'नाबार्ड'च्या उपक्रमाच्या माध्यमातून २१०० बचतगट ऑनलाईन करण्यात आले आहेत.
- मेळाव्याला १६०० महिला, युवतींची उपस्थिती

"

या कार्यक्रमातून शिक्षणासह उद्योग, व्यवसाय क्षेत्राबाबतची उपयुक्त माहिती मिळाली. महिला दिनानिमित्त मी पहिल्यांदाच या मार्गदर्शनपर कार्यक्रमात सहभागी झाले.

- वनिता गावडे, कोल्हापूर

खूप चांगला कार्यक्रम झाला. यातून महिला बचत गटाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्याबाबतची माहिती मिळाली. त्यासह शिवाजी विद्यापीठ पाहण्याची संधी मिळाली.

- अर्चना शेटे, राजोपाध्येनगर

9 MAR 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विविध कार्यक्रमांनी महिला दिन साजरा

म. टा. प्रतिनिधी कोल्हापूर

व्याख्याने, शिबिरे, कर्तृत्ववान महिलांचा सन्मान अशा विविध कार्यक्रमांनी कोल्हापुरात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. महापालिका, शिवाजी विद्यापीठ यांच्यासह सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था यांच्यावतीने अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### 'विरोधाभास हाच प्रगतीतील अडथळा'

'समाजामधील आर्थिक उन्नतीचा विरोधाभास हा सामाजिक प्रगतीमधील मुख्य अडथळा आहे. या विरोधाभासाची दरी कमी करण्यासाठी प्रयत्नपूर्वक कार्य केले पाहिजेत,' असे प्रतिपादन पेण येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ.वैशाली पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये बेटी बचाव अभियानांतर्गत जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये डॉ.वैशाली पाटील बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, संयोगिताराजे छत्रपती उपस्थित होते. श्रीमंत संयोगिताराजे म्हणाल्या, सशक्त समाज घडविण्यामध्ये स्त्रीयांचे फार मोठे योगदान आहे. त्यामुळे स्त्रीयांनी स्वतःला अबला समजू नये. प्रास्ताविक डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मीना पोतदार यांनी केले. यावेळी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांचेसह विद्यार्थी उपस्थित होते.



महापालिकेच्या वतीने महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सांस्कृतिक गुणदर्शन सादर करताना सहभागी महिला

## महापालिकेतर्फे मुक्तांगिणी कार्यक्रम

जागतिक महिला दिनानिमित्त कोल्हापूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्यावतीने ड्रीम वर्ल्ड वॉटर पार्क, रमणमळा येथे आयोजित मुक्तांगिणी कार्यक्रमाचे आयोजन केले. सरिता सुतार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी उखाणे स्पर्धा, फॅशन शो, गीत गायन व नृत्य या स्पर्धा घेण्यात आल्या. यानंतर ड्रीम वर्ल्ड वॉटर पार्कमधील विविध वॉटर गेम्सचा महिलांनी मनमुराद आनंद लुटला. उखाणे स्पर्धेत सत्वशिला भोसले, आक्काताई कांबळे,बालाबाई पोवार विजयी झाल्या. फॅशन शो मध्ये सुशीला भोसले, अनुसया सुतार, कविता कळवट यांनी बाजी मारली. गीत गायनस्पर्धेत सुजाता बनगे, राजश्री पाटील, पूजा माळी तर डान्स स्पर्धेत कविता कळवट, मालन बुचडे, प्रिया कुरणे यांनी यश मिळवले.

### जिजाऊ ब्रिगेडतर्फे ज्येष्ठ महिलांचा सत्कार

राजमाता जिजाऊ ब्रिगेडच्यावतीने वयाची शंभरी पूर्ण केलेल्या महिलांचा सत्कार करण्यात आला. आमशी येथील १०२ वर्षाच्या पार्वती पाटील, कोगे येथील १०८ वर्षांच्या शांताबाई पाटील, कोल्हापुरातील सरदार तालीम परिसरातील १०० वर्षे पूर्ण केलेल्या बायाक्का जाधव यांचा सत्कार करण्यात आला. ब्रिगेडच्या अध्यक्ष सुनीता पाटील व कार्याध्यक्ष सरीता सासने यांनी यावेळी महिलांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी ब्रिगेडच्या कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

### गोकुळमध्ये व्याख्यान

आजकाल मानवाच्या निरोगी शरीराची व्याख्या त्यांच्या शारीरिक स्थितीवरून ठरविण्यात येते. ती चुकीची असून मानवाच्या शरीरावर मानसिक, शारीरिक व सामाजिक स्थितीचा परिणाम होत असतो. म्हणूनच या तिन्ही बाबींचे योग्य संतुलन जिथे राखले जाते तेच निरोगी शरीर असते असे प्रतिपादन डॉ.कालिंदी रानभरे यांनी व्यक्त केले. कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ तथा गोकुळच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित केलेल्या महिला मेळाव्यामध्ये 'स्त्रियांचे मानसिक आरोग्य' या विषयावर त्या बोलत होत्या.अध्यक्षस्थानी चेअरमन विश्वास पाटील होते. स्वागत व प्रास्ताविक सौ.संपदा थोरात यांनी केले तर आभार संचालिका अनुराधा पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन एम.पी.पाटील यांनी केले.



माविमच्या वतीने महिलादिन कार्यक्रमाचे उदघाटन करताना डॉ. डी. टी. शिर्के, बाळासाहेब झिंजाडे, नंदू नाईक, वर्षा पाटोळे, डॉ. भारती पाटील, विजय फडके, वेणू गोपाल आदी

## 'उद्योगातून प्रगती करा'

बचत गटातील महिलांनी कौशल्य विकासाद्वारे उद्योग व्यवस्थापन करुन आपली प्रगती साध्य करावी असे प्रतिपादन शिवाजी विद्यापिठाचे प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व महिला आर्थिक विकास महामंडळ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सशक्तीकरण कार्यक्रम लोककला केंद्रात घेण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, महापालिकेचे सहायक आयुक्त मंगेश शिंदे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, मानव विज्ञान अधिशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. सुमन बुवा आदी उपस्थित होते.

### नॅबतर्फे अंध महिलांचा सत्कार

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड तथा नॅब संस्थेच्यावतीने अंधत्वावर मात करून यश मिळवलेल्या महिलांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अपर्णा संत, कविता कारंजकर, रजनीगंधा ऐळापुरे, विद्या पोवार, सरिता साळोखे, जयश्री हत्तीकटगे, नाजिया बागवान, छाया कांबळे, सावित्री चव्हाण, जयश्री कांबळे, पूजा देसाई, संगीता काटवे, शीतल पोवार, संगीता देवगडे, प्रणाली कांबळे यांना सन्मानित करण्यात आले. डॉ. विद्युत शहा व जयश्री पिसे यांनी या अंध महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव केला. संस्थेचे अध्यक्ष मुरलीधर डोंगरे यांनी प्रास्ताविक केले. सचिव विजय रेळेकर यांनी आभार मानले. डॉ. मीना डोंगरे यांनी निवेदन केले. यावेळी मुख्याध्यापक के. ई. पवार यांनी प्रास्ताविक केले. अल्पबचत व महिला प्रधान विभागाच्यावतीने महिलादिनानिमित्त कोल्हापूर प्रवर अधीक्षक रमेश पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी महाराष्ट्र अल्पबचत महासंघाचे अध्यक्ष पी.जी. कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मुख्याध्यापिका शैलजा भोसले यांनी प्रास्ताविक केले. भारती कडेकर यांनी स्वागत केले.

जनसंपर्क कक्ष
19 MAR 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कृतिशील जातीनिर्मूलन हवे


## इतिहास विभागात आयोजित चर्चासत्रात प्रा. हरी नरके यांचे मत

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे त्यांच्या समकालीनांसमवेत वैचारिक मतभेद असले तरी वैयक्तिक मनभेद कधीही बाळगले नाहीत, हे त्यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य होते,' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास विभाग व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'डॉ. आंबेडकर आणि त्यांचे समकालीन (समानता आणि मतभिन्नता- एक अभ्यास)' या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रात ते बीजभाषक म्हणून बोलत होते. इतिहास विभागाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या मानव्यविद्या विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या.

बाबासाहेबांच्या समकालीन संदर्भांचा अभ्यास करताना स्त्री-पुरूष समता, सृजनशील ज्ञाननिर्मिती आणि कौशल्य विकास, कृतिशील जातिनिर्मूलन, चिकित्सा आणि लोकशाही मूल्यांची जोपासना या पंचसूत्रीचा आधार अभ्यासकांनी घेण्याची आवश्यकता प्रा. नरके यांनी बोलून दाखवली.



प्रा. हरी नरके

प्रा. नरके म्हणाले, 'बाबासाहेब आणि त्यांचे समकालीन म्हटले की, सर्वप्रथम त्यांचे आणि महात्मा गांधी यांच्या संबंधांचा विचार पुढे येतो. या दोन्ही व्यक्ती आपापल्या ठिकाणी मोठ्या होत्या. त्या काळावर त्यांनी स्वतःची नाममुद्रा उमटविलेली आहेच. पण या दोघांच्याही मोठेपणात, दोघांच्याही विकासात त्यांचा परस्परांचा अत्यंत मोलाचा वाटा होता, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. तीच बाब काँग्रेस अर्थात् तत्कालीन काँग्रेसचे नेते जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्रप्रसाद आणि मौलाना आझाद यांच्या आंबेडकरांशी असलेल्या संबंधाच्या बाबतीतही होते. घटना समितीमध्ये बाबासाहेबांना आणण्यासाठी बॅरिस्टर जयकरांच्या रिक्त जागेवर त्यांना निवडून आणण्यास गांधींनी सांगितले आणि काँग्रेसने बाबासाहेबांना बिनविरोध निवडून दिले. तत्पूर्वी, १९४२ मध्ये बाबासाहेबांनी 'गांधी आणि काँग्रेसने अस्पृश्यांचे काय केले?' हा ग्रंथ लिहिल्याने काँग्रेसमध्ये त्यांच्याविषयी नाराजी स्वाभाविक होती. तथापि, घटना समितीसमोर भाषण करताना बाबासाहेबांनी सर्व सदस्यांना असे आवाहन केले की, आपण सर्वजण कुठल्या ना कुठल्या गटाचे नेते आहोत, पण आता आपण आपले सारे गटतट विसरून, सारे मतभेद बाजूला ठेवून एकत्र येऊ या आणि येथून पुढे शतकानुशतके भावी पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल, अशी घटना एकदिलाने निर्माण करू या. बाबासाहेबांच्या या आवाहनाने समस्त काँग्रेसजन चकित झाले होते. त्यांनी बाबासाहेबांच्या भूमिकेचे स्वागत केले.

ते म्हणाले की, एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे घटना समितीत काँग्रेसचे ८२ टक्क्यांहून अधिक बहुमत असूनही त्यात विरोधकांनाही स्थान देण्याचे औदार्य त्यांनी दाखविले. त्याचप्रमाणे हजरजबाबी युक्तिवाद करून आपल्या विरोधकांनाही म्हणणे पटवून देऊन मतपरिवर्तन घडवून आणण्याचे बाबासाहेबांचे कौशल्यही वादातीत होते. याची प्रचिती घटना समितीत वेळोवेळी आलेली आहे. त्यामुळेच भारताच्या बहुविविधतेच्या संस्कारांचे जतन करण्याच्या भूमिकेतून परंपरा व परिवर्तन यांचा मेळ घालणारी राज्यघटना स्वतंत्र भारताला लाभली, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

अध्यक्षीय मनोगत डॉ. भारती पाटील यांनी व्यक्त केल्या. यावेळी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. अवनिश पाटील यांनी परिचय करून दिला. सह-समन्वयक डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी माजी अधिविभाग प्रमुख डॉ. अरुण भोसले, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, प्रा. सुरेश शिपूरकर, प्रा. व्यंकाप्पा भोसले, प्रा. गौतमीपुत्र कांबळे, डॉ. टी.एस. पाटील, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. चंद्रकांत कुरणे, डॉ. कविता गगराणी यांच्यासह अनेक संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
19 MAR 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समृद्ध असेल तरच भाषा टिकेल

## डॉ. सुलभा ब्रह्मनाळकर : शिवाजी विद्यापीठात भाषेच्या आरोग्यावर परिसंवाद

कोल्हापूर, ता. ८ : 'भाषा ही उत्क्रांतीसारखी असते. ती समृद्ध असेल, तर टिकेलच. यातून भाषेचे प्रवाहीपण मान्य करणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन डॉ. सुलभा ब्रह्मनाळकर यांनी केले. मराठी अधिविभाग आणि सावली केअर सेंटरतर्फे राजर्षी शाहू सभागृहात आयोजित 'आरोग्याची भाषा आणि भाषेचे आरोग्य' या विषयावरील परिसंवादात त्या बोलत होत्या. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. ब्रह्मनाळकर म्हणाल्या, ''आजच्या मराठी भाषेपेक्षा इतिहासकालीन आणि ज्ञानेश्वरांच्या काळातील मराठी वेगळी होती. आताच्या पिढीतील आजोबा, मुलगा आणि नातवाची मराठी वेगळी असते त्यामुळे भाषा ही



कोल्हापूर : परिसंवादात बोलताना डॉ. सुलभा ब्रह्मनाळकर.

प्रवाही आहे. कोल्हापूर, सोलापूर, पुणे, नागपूर, कोकण येथील भाषा स्थळ, काळानुरूप बदलत असते. भाषा संवादाचे प्रमुख माध्यम आहे. त्यामुळे भाषेकडून खूपच अपेक्षा वाढलेल्या आहेत. भाषेकडे भावनिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक गरजा आहेत. त्या पूर्ण होत नसेल, तर त्या जोडल्या जाणार नाहीत. मराठी भाषा टिकविण्यासाठी समृद्ध होण्यासाठी सामुदायिक प्रयत्न आवश्यक आहेत.''

जगामध्ये विपुल प्रमाणात सर्वच क्षेत्रांमध्ये इंग्रजीमधून लेखन झालेले आहे. त्याचा अभ्यास करण्यासाठी इंग्रजी भाषा जाणणेही आवश्यक आहे. जगामध्ये विस्तारलेले ज्ञान क्षेत्र कवेत घ्यावयाचे असेल तर जागतिक भाषा शिकणे आवश्यक आहे. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ''मराठी भाषेची वाढ होण्यासाठी सामूहिक प्रयत्न गरजेचे आहेत.'' डॉ. आशुतोष दिवाण, ज्येष्ठ पत्रकार उदय कुलकर्णी, सावली केअर सेंटरचे डॉ. किशोर देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सोनाली नवांगुळ व राजेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

19 MAR 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बँकिंगचे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहचावे

## सारस्वत बँकेचे संचालक पी. एन. जोशी यांचे मत: विद्यापीठात शॉर्ट टर्म प्रोग्रामचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

बँकीग व्यवस्थेमध्ये सहकारी, व्यावसायिक, तसेच राष्ट्रीयकृत बँकांसमोर स्पर्धेबरोबरच वाढत्या अनुत्पादीत कर्जाचा बोजा ही दोन्ही आव्हाने आहेत. भारतीय रिझर्व्ह बँक व वित्त मंत्रालयाच्या कार्याचीही चिकित्सा होणे आवश्यक आहे. त्यासाठी बँकीग व्यवस्थेमधील ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे, असे मत सारस्वत बँकेचे संचालक, युनायटेड वेस्टर्न बँकेचे माजी अध्यक्ष पी. एन. जोशी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील कै. रा. ना. गोडबोले अध्यासनाच्या वतीने आयोजीत शॉर्ट टर्म प्रोग्रामच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. ज्येष्ठ अर्थतज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, नाबार्डचे एस. एल. कुंभारे उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कै. रा. ना. गोडबोले अध्यासनाच्या कार्यक्रमात बोलताना सारस्वत बँकेचे संचालक पी. एन. जोशी. डावीकडून डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. जे. एफ. पाटील, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के.

जोशी म्हणाले, १९६९ मध्ये बँकांचे राष्ट्रीयकरण झाल्यानंतर बँकांचे सामाजिक उत्तरदायित्व वाढले. रिझर्व बँकेने प्रथम बँकाचे नियंत्रक म्हणून काम केले. पण त्यानंतर ठेवींवरील विमा, कर्ज व्यवस्थापन व इतर जबाबदाऱ्यांमुळे रिझर्व्ह बँकसुध्दा तणावाखाली काम करत असल्याचे जाणवते. वाढत्या अनुत्पादित कर्जामुळे सार्वजनिक बँकांसमोर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. याबाबत रिझर्व्ह बँक व वित्तमंत्रालयांचीही कार्यप्रणाली विश्वासाई नसल्याचे म्हंटले जाते, असेही जोशी यांनी सांगितले.

प्रा. डॉ. जे.एफ. पाटील म्हणाले, बँकींग व्यवस्था विश्वासावर चालणारी यंत्रणा आहे. या विश्वासालाच तडा जाण्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याची खंत व्यक्त करून सर्वसामान्य ग्राहकांच्या ठेवींचा दुरूपयोग मोठ्या कर्ज बुडव्यांच्या तावडीतून स्वत:ला सोडवण्यासाठी बँका करतील की काय, अशी भीती वाटत आहे. एफआरडीआय बीलासंदर्भात कायदा होण्यापूर्वी जनमताचा रेटा सरकारपर्यंत पोहोचला तर योग्य ते बदल या बिलामध्ये होतील, अशी अपेक्षा डॉ. पाटील यांनी व्यक्त केली.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के म्हणाले, शिक्षकांनी अशा कार्यक्रमामधून आपले ज्ञान अद्ययावत करावे. तसेच पीककर्ज व विमा याबाबत समाजामध्ये जनजागृती केली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे डॉ. व्ही. बी. ककडे यांनी 'आभासीचलन" या विषयावर तर डॉ. कुंभारे यांनी 'नाबार्डच्या कार्यपदधतीवर" मार्गदर्शन केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक, डॉ. केदार मारूलकर यांनी सुत्रसंचालन तर डॉ. ए. एम. गुरव यांनी आभार मानले. शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
9 MAR 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठात उद्या कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बौद्धिक संपत्ती हक्क कक्षातर्फे शनिवारी (ता. १०) विज्ञान दिन आणि जागतिक बौद्धिक हक्क दिनाच्या अनुषंगाने 'बौद्धिक संपत्ती अधिकार' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा होत आहे. राजर्षी शाहू सभागृहात सकाळी साडेदहा वाजता त्यास सुरवात होईल. विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने ती होत आहे. नीलेश पंडित व अनिल कुलकर्णी मार्गदर्शन करतील, अशी माहिती कक्षाचे संचालक डॉ. अनिल घुले यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 MAR 2018
तरुण भारत

## विद्यापीठात उद्या कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील बौद्धिक संपत्ती हक्क कक्षाच्या वतीने शनिवार १० रोजी सकाळी १०.३० वाजता राजर्षी शाहू सभागृहात कार्यशाळा आयोजित केली आहे. या कार्यशाळेमध्ये निलेश पंडीत, अनिल कुलकर्णी हे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेला विद्यार्थी, प्राध्यापकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. अनिल घुले यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 MAR 2018
लोकमत

# विद्यापीठात उद्या 'बौद्धिक संपत्ती' कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बौद्धिक संपत्ती हक्क कक्षाच्या वतीने उद्या, शनिवारी सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये 'बौद्धिक संपत्ती अधिकार' या विषयावरील कार्यशाळा होणार आहे. यामध्ये नीलेश पंडित आणि अनिल कुलकर्णी मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती डॉ. अनिल घुले यांनी दिली.